# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. १६ डिसेंबर २०२२

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६६८/२०२२ भादंविसक ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/१२/२०२२ रोजी पहाटे ०५.०० वा ते दि. १५/१२/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १५/१२/२०२२ रोजी २३.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नागनाथ सिद्राम म्हेत्रे, वय- ४८ वर्षे, रा. घर नं. ०५, कुमठा नाका, गुरप्पा म्हेत्रे नगर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १,१०,०००/- रु रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कुटुंबासह तिरुपती बालाजी येथे देवदर्शनाकरीता गेले असताना, यातील कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुद्दाम लबाडीने फिर्यादीचे संमतीविना फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तोडुन आत प्रवेश करुन, बेडरुममधील कपाटाचा दरवाजा उचकटुन, त्यामध्ये ठेवलेली वरील वर्णनाची रोख रक्कम चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२७ पाटील- ९३५६६३६३४८ |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७२२/२०२२ भादंविसक २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०२/१२/२०२२ रोजी १९.०० वा चे सुमारास, मडके वस्ती, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १५/१२/२०२२ रोजी २१.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विद्याराणी भालचंद्र काळे, वय- ३४ वर्षे, रा. ए व्हिंग रो हाऊस नं. ३, ग्रीन अपार्टमेंट, मडके वस्ती, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | प्रशांत कांबळे, पुर्ण नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी, फिर्यादीची आई व फिर्यादीची मोठी बहिण असे मिळुन फिर्यादीचे घरी पायी चालत येत असताना, हुंदाई शोरुम समोर डिवायडरचे बाजुस, लोखंडी ब्रीजजवळ नमुद ठिकाणी हायवे रोड क्रॉस करण्यासाठी डिवायडर बाजुस थांबले असता, यातील आरोपीताने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्रं. एम एच १३ डी डब्ल्यु ३०३२ हि हयगयीने निष्काळजीपणाने, भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीच्या आईस व बहिणीस जोराची धडक देवून त्यांना गंभीर जखमी केले व स्वत: गंभीर जखमी झाला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११८६ घुगे |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६६७/२०२२ भादंविसक ३८०,४५४,४५७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/१२/२०२२ रोजी १८.०० वा ते दि. १५/१२/२०२२ रोजी ०९.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १५/१२/२०२२ रोजी १८.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अबुबकर महिमुद पठाण, वय- ३० वर्षे, रा. २८९३, इकबाल रजबरे यांच्या घरात भाडयाने ते १, पंचमुखी मंदिर जवळ, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ८१,०००/- रु त्यात १.२ ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, ५ ग्रॅम सोन्याचे अयरींग व रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांचे राहते घराचे दरवाज्याचे कुलुप कशाने तरी तोडुन घरात प्रवेश करुन लोखंडी कपाट उघडुन त्यातील वरील वर्णनाचा व किंमतीचा ऐवज व रोख रक्कम ही कोणीतरी अज्ञात चोरयाने फिर्यादीच्या संमतीवाचुन, मुद्दाम चोरुन नेले आहेत म्हणून. तपास:- पोहेकॉ/ २७५ रुपनर |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६२३/२०२२ भादंविसक ३०४(अ) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०४/०९/२०२२ रोजी १४.०० वा चे सुमारास, मुलतानी बेकरी समोरील इमारतीत, होटगी रोड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १५/१२/२०२२ रोजी १८.१४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | रुपा चैतन मंठाळकर, वय- ३० वर्षे, रा. १३, समता नगर विजय देशमुख नगरच्या समोर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | संजय भिमानवरु, रा. सोलापूर |
| **मयताचे नाव** | **:** | चेतन सुधाकर मंठाळकर, वय- ३५ वर्षे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे पती हे वरील ठिकाणी वरील आरोपीताकडे काम करीत असताना ५ व्या मजल्यावरुन बांधकामाचे माल घेवून जाणारी लिफ्ट फिर्यादीचे पतीचे अंगावर माल घेवून जाणारे लिफ्ट पडल्याने त्यात त्याचे डोकीस व पाठीच्या मणक्यास जबर मार लागुन तो जबर जखमी होवून मयत झाला आहे. तसेच कॉन्ट्रॅक्टर संजय भिमानवरू यांना बांधकामाच्या ठिकाणी माल घेवून जाणारी लिफ्ट चे बाबत कोणतीही काळजी घेतलेली नव्हती तसेच सुरक्षेचे कोणतेही उपाययोजना केलेल्या नव्हत्या. त्यामुळे सदरची लिफ्ट चेतन याचे अंगावर पडुन त्यात तो जबर जखमी होवून मयत झाला आहे व त्याचे मरणास वरील आरोपीत हा कारणीभुत झालेला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२०१ जाधव - |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६२४/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २३/११/२०२२ रोजी १०.३० वा चे सुमारास, कडेगाव येथील बस स्टॅन्ड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १५/१२/२०२२ रोजी २२.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | भारती रविराज जाधव, वय- २७ वर्षे, रा. प्रताप नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **मयताचे नाव** | **:** | ७६,०००/- रु ३ तोळे १०० मिली वजनाचे सोन्याचे गंठण, १ चांदीचा छल्ला असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या पाठण ते अक्कलकोट या बस मध्ये चढत असताना, गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीच्या कपडयाच्या बॅगेतील फिर्यादीचे नमुद वर्णनाचे व किंमतीचे दागीने, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, चोरुन नेले आहे म्हणुन. **तपास:- सदरचा गुन्हा हा कडेगाव पोलीस ठाणे जिल्हा सांगली येथे वर्ग केले आहे.** |